**<u>नि.दि.दावा क्र. १९५/२०१८</u>**

निशाणी क्र. ५० व ६० लगत.

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस के मेसे यांचेमार्फत</u>–

माझे सासरे अंकुश यांना दोन भाऊ लहु व अरविंद हे आहेत. तसेच त्यांना दोन बहिणी आहेत त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये त्यांचे भाऊ व बहिणी यांना सामील केले नाही. दावा दाखल करण्यापुर्वी एकुण किती जमीनी आहेत व वडिलोपार्जित जमीनी किती आहेत याबाबत माहिती घेतली आहे. एकुण किती गट क्रमांक वडिलोपार्जित आहेत व किती गट क्रमांक स्वमिळकती आहेत हे मला सांगता येणार नाही. माझे सासु व सासरे हे शिक्षक म्हणुन नोकरीस होते. प्रतिवादी क्र.१ अभिजीत याच्या आजोबांचे नाव नाना शेळके हे होते. त्यांचे आजोबा व सर्व कुटुंब हे इंदोर, मध्यप्रदेश येथे राहत होते कायाबाबत मला माहिती नाही.

<u>विधिज्ञांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला</u>.

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/–

दिनांक : १३/०८/२०२५ ( एम. सी. शेख )

पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर

<u>शपथेवर उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस के मेसे यांचेमार्फत पुढे सुरु</u>–

दावा दाखल करतेवेळी वाद मिळकतीचे ७/१२ उतारे व इतर उतारे मी पाहिले होते. प्रत्येक जमीनीचा फेरफार मला माहित नाही परंतु सर्व जमीनी या वडिलोपार्जित आहेत. काही मिळकती या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. एकत्रीत कुटुंब असताना मिळकती घेतल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. माझे आजेसासरे मध्यप्रदेशमध्ये राहात होते का मला माहित नाही. त्यावेळेस गट क्रमांक ७२९ हा वडिलोपार्जित होता का हे मला सांगता येणार नाही. सदर जिरातय मिळकतीमपासुन उपजिविका होत नसल्यामुळे माझे आजेसासर इंदोर, मध्यप्रदेश येथे उपजिविकेसाठी गेले होते का याबाबत मला माहिती नाही. माझे आजेसासरे कोठे कामाला होतो याबाबत मला माहिती नाही त्यामुळे त्यांनी कोठे जमीन घेतली

होती याबाबत मला माहिती नाही. आजोबांच्या मिळकतीचे फेरफार मी पाहिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजेसासरे यांचे स्वकष्टाच्या मिळकती असल्यामुळे त्यामध्ये मला वाटणी मागण्याचा कोणताही अधिकार नाही.

माझे सासु सासरे शिक्षक होते. हे म्हणणे खरे नाही की, प्लॉट क्र.३३४ ही मिळकत माझ्या सासुने तिच्या स्वकमाईतुन खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नोकरीनिमित्त बाहेर असल्यामुळे मला दावा मिळकती पाहण्याचा योग आला नाही व मी उतारे देखील पाहिले नाहीत. माझ्या सास–यांना दोन भाऊ व दोन बहिणी आहेत. माझे सासरे व त्यांचे दोन भावांमध्ये वाटणी झाल्याबाबत कागदपत्र सादर करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे व त्यांच्या भावांमध्ये आजपावेतो वाटणी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र.१ मधील लग्न झाले व मुलगा झाला हे वगळता संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, काही वाद मिळकती या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातुन घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बागायती मिळकतीतुन उत्पन्न घेत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने चोरुन दुसरे लग्न केले व चारित्र्यावर शिंतोडे उडवित असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.७२९ वगळता इतर कोणत्याही मिळकतमध्ये हक्क मागण्याचा अधिकार मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदत असताना कुटुंबाच्या सदस्यांचा अपमान करत असे व उध्दट वागत असे आणि माझ्या मुलाला त्याच्या वडिलाला भेटु देत नसे. हे म्हणणे खरे नाही की, माझे संजय दळवी या त्रयस्त इसमाबरोबर विवाहबाहय संबंध झाल्याने प्रतिवादी क्र.१ ला त्रास देण्यासाठी सदरच्या खोटया केसेस करत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दिनांक : १३/०१/२०२६ ( एम. सी. शेख )

पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर